# प्रकरण ४ थे

# 'भूमी' या कादंबरीतील नायिका व आधुनिक स्त्रियांच्या सामाजिक समस्या

# प्रकरण चौथे

# 'भूमी' या कादंबरीतील नायिका व आधुनिक स्त्रियांच्या सामाजिक समस्या

'न स्त्री स्वातंत्र्य महती' ही मनूची अशुभ वाणी घरोघरी स्त्रीच्याभोवती गिरट्या घालत होती. हिंदु स्त्रीला स्वत:चे अस्तित्व नव्हते, कुटूंबात कायद्याचे स्थान मिळते. सतीची चाल, सक्तीचे वैधव्य, केशवपण, बालविवाह, जरठ विवाह या रूढी दृढपणे चालू होत्या. १९ व्या शतकापासून समाज सुधारणेची चळवळ सुरू झाली. स्त्री शिक्षणाने स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. व त्या सर्व त्या क्षेत्रात यशस्वी पदार्पण करू लागल्या. नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे वाढते प्रमाण त्यामुळे स्वतंत्र कायद्याची निर्मिती करावी लागली. हजारो वर्षापासून चालत आलेल्या रूढी परंपरा तत्वे नितीनियम यांना हादरे बसले. समाजचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. सांस्कृतीक फेरबदल झाले. चारभिंतीत राहून चूल आणि मुल एवढ्यातच वावरणारी स्त्री समाजाच्या सर्व क्षेत्रात कार्य करू लागली, आपला ठसा उमटवू लागली शक्ती, बुध्दी, पात्रता यात आपण पुरूषाइतकेच सक्षम आहोत हे सिध्द करू लागली. बदलत्या समाजाचा, संस्कृतीचा, परिणाम स्त्रियांवर झाला. स्वातंत्र्यापूर्वी आपल्या कोषात मग्न असणारी स्त्री स्वातंत्र्यानंतर विविध क्षेत्रात पदार्पण करू लागली आणि यशस्वीपण होऊ लागली. स्वातंत्र्यापुर्वी शिक्षणक्षेत्रात स्त्रियांची संख्या कमी होती स्वातंत्र्यानंतर मात्र स्त्री शिक्षणाबरोबरच समाजकारण, राजकारण, चित्रपट, नर्सिंग, संगीत अशा क्षेत्रात कार्य करून ठसा उमटवू लागली. घराइतकेच आपल्या कार्याला शिक्षणाला, अभ्यासाला महत्व देवू लागली. समकालीन लेखिका म्हणून 'आशा बगे' यांच्या "भूमी" साहित्यकृतीचा अभ्यास करत असताना त्यांचे अनुभव विश्व चांगल्या अर्थाने भारतीय स्त्रीचे असून भारतीय परंपरेला समर्पीत झालेल्या समृध्द स्त्रीचे अनुभव विश्व वाटते. त्यांच्या कादंबरीतील समृध्द व्यक्ती चित्रण जीवनावरील निष्ठा, प्रेम, स्त्रीला भोगावे लागणारे ताण, नातेसंबंधांची होणारी परवड व त्यातील स्थान यांचे अत्यंत मार्मीक समर्पक व कलापुर्ण चित्रण केले आहे.'भूमी' ची नायिका 'मैथिली' असून वाल्मिकींनी रघुरामचंद्रांच्या

दृष्टीतून चितरलेल्या आखीव आयुष्यात अडकून न राहता वेगळेपणाने आयुष्य जगणाऱ्या मैथिलीची कथा आहे. वडिलांचा मृत्यू ,धर्माच्या भिंती ओलांडून तामिळी, ख्रिश्चन आईच्या संस्कारात वाढलेली, समुद्र किनारी लहानशा गावतील नर्सची मुलगी, अम्माच्या मृत्यूनंतर तिचे आयुष्य मुंबईत आत्याकडे येऊन वळणावळणानी जाते. जागेचे झालेले स्थित्यंतर, बदललेली शाळा, गाव, मानसं, जीवाची सखी होवून गेलेली गॅलरी, रेल्वेच्या रूळांचा खडखडाट आवाज, यांच्यातील प्रत्येक आवाज तिला तिच्यातील स्वत:ची ओळख करूण देतो. आत्याच्या मायेची पाखर तिच्या चुकावर पडदा पाडू शकत नाही. त्यामुळे तिला मिळालेली पुस्तकांची जोड याच्यातून एका अनाथ हट्टी मुलीचं रूपांतर बुध्दीवान समंजस्य आत्मसामर्थ्याच्या बळावर आयुष्य म्हणजे काय आहे हे जाणून घेत असताना प्रगल्भ स्त्री मध्ये रूपांतर होते. ‘रामाची मैथिली’ ही समाजाने दाखविलेल्या खोट्या अविश्वासाची शिक्षा भोगते. अग्नी परिक्षेला सामोरे जावे लागते. दोन मुलांचा आणि मैथिलेचा सांभाळ करून सत्य रामापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न वाल्मिकी करतात. रामाला त्याच्या चुकीची जाणीव होते परंतु राजकन्या असलेली हुशार, कर्तव्यनिष्ट, भारतीय संस्कृतीच्या परंपरेने चालत आलेली पुरूषी संस्कृतीला बळी पडलेली दिसते. रावणाने पळवल्यानंतर तिची व्यवस्था अशोकवनात संरक्षण देऊन ठेवलेली असते. सीतेला वचन देऊन तिच्या मनाविरूध्द मनात वासना येणार नाही इतका प्रामाणिकपणा दाखविलेला दिसतो. रामाची अर्धांगीनी म्हणून सत्वशिल असलेल्या सीतेवर परीटाच्या बोलण्याने रामाच्या मनामध्ये विष पेरले जाते. परमेश्वराचा अंश, सत्यप्रिय, एकवचनी, एकपत्नीव्रती, आदर्श राजा, प्रजेवर पुत्रवत प्रेम करणारा राजा सीतेला वनात सोडून देतो. राक्षस असूनही नेहमीसारखी बळजबरी न करता सीतेचे मन वळवून तिच्या संमतीने विवाहबध्द व्हायचे हे रावणाने ठरविले होते. रामाने युध्दोत्तर सीतेला जी वागणूक दिली तिचा उलगडा सहजासहजी होतो. राम हा एक सामान्य माणूस होता आणि तत्कालीन रितीरिवाजांना अनुसरून अग्नीदिव्य करावयास लावले. युध्दकांडात वर्णिलेल्या अग्नीदिव्यानंतरही उत्तरकांडात सांगितल्याप्रमाणे खरोखर सीतेची अरण्यात पाठवणी करण्यात आली असेल तर भारतीय स्त्रियांच्या असहाय्य अवस्थेचे प्रतिबिंब दाखवण्यापुरतीच घटना उपयोगी पडते. एखाद्या वाईट प्रवृत्तीचा पुरूष पशुसारखे वर्तन करतो.

त्यामुळे एखाद्या निर्व्याज मनाच्या स्त्रीवर पापकलमाचा कलंक लागतो. आयोध्याचा त्याग करताना रामाला फारसे दु:ख झाले नाही पण सीतेच्या वियोगाने दु:खसागरात बुडून गेलेला राम सीतेवर अजोड प्रेम करत होता. रामाच्या ठिकाणी डोळे निवीवणारे सौंदर्य ,सामर्थ्य ,धैर्य ,मनाची निर्व्याजता, दयाशिलता, वाणीतील माधुर्य मुत्सदीपणा, जीवनाकडे पाहण्याचा ज्ञानमुलक दृष्टीकोन, रामाचे सीतेवरचे प्रेम तिच्यात्यावरील प्रेमाइतकेच गाढ होते. जी स्त्री परक्या पुरूषाच्या घरात इतके दिवस राहीली आहे तिचा स्वीकार करणं खऱ्या क्षत्रियास शोभत नाही हे उद्‌गार रामाचेच, परमेश्वराचे स्त्री अंग म्हणजे सीता म्हणजे कारूण्याचे आणि क्षमा शिलतेचे प्रतिक रामायनाबरोबरच सीतेचे दु:खे संपुष्टात आली नसून त्याचा प्रवाह आपल्या स्त्रियांच्या जीवनातून अजूनही वाहतच आहे. युध्दानंतर सीतेची अरण्यात पाठवणी म्हणजे परंपरेने चालत आलेली संस्कृती भारतीय स्त्रियांच्या असहाय्य अवस्थेचे प्रतिबिंब दाखवण्यासाठी उपयुक्त ठरते. परंतू आजची आशा बगेंच्या 'भूमी' तील 'मैथिली' स्वत:मध्ये असलेला सत्वांश शोधून शून्यातून विश्व आकारण्याचा प्रयत्न करते. प्रत्येक क्षणोक्षणी येणाऱ्या संकटांना तोंड ती देत आपले अत्युच्य ध्येय साकारण्याचा प्रयत्न करते. समुद्र किनाऱ्यावर पूट्ठने काढलेल्या रेषारेषांनी काढलेली चित्रे न्याहाळत स्वत:त हरवलेली दिसते. अम्माच्या मृत्यूनंतर स्विकारलेली, तडजोड आत्याचे कृपाछत्र घेऊन पास–नापासाचा वळण घेत चाललेली मैथिली, मधुच्या प्रेमळ मैत्रीचे कुतुहल, उदयची शारिरीक वासना, तिथे मनाच्या भावुकतेचा काहीही संबंध न ठेवणारा दिसतो. गोपाळराव, संजू यांचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन आश्रयाला आलेली देखणी मुलगी वाचनालयातल्या प्रो.देवस्थळींच्या पुस्तकांनी घातलेली मोहिनी त्याच पुस्तकातून अस्थिर आयुष्याचा गोफ विणण्याचा मैथिलीने घेतलेला ध्यास १२ वी ला विशेष प्राविण्य मिळवून कलाशाखेत इंग्रजी विषय ठेवून पूर्णपणे अभ्यासविषयात झोकून घेतलेली मैथिली काहीशी अबोल एकाच विषयावर ठाम हट्टी झालेली हा बदल तिच्यामध्ये नवनिर्मिती करण्यासाठीच दिसून येतो. कॉलेजमध्ये केलेल्या शेक्सपियरच्या भूमिकेवर फिदा झालेले मिलिंद, चेतन, किर्ती यांच्याबरोबर असताना गप्पांच्या ओघात जवळ आलेला मिलिंद पण धर्माच्या भिंती ओलांडण्याची धमक नसलेला मनाने खजील झालेला दिसून येतो. मैथिलीला वाटत असते त्यानं ठामपणे आपल्या



BARR. B. KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पाठीशी उभ रहावं पण मिलींद हरहुन्नरी धडपडणारा स्मार्ट ही उभी केलेली व्यक्तिचित्रणे गळून पडल्यासारखी दिसतात झालेल्या अपमानाचा, वियोगाचं दु:ख न कवटाळत बसता ज्यांनी आपल्याला आयुष्याचा अर्थ दिला त्या पुस्तकाकडे वळणे मैथिलीला गरजेचे वाटते. प्रो. देवस्थळींची विद्वत्ता गाढा अभ्यासक म्हणून ती देवस्थळी बाईंच्या घरातील मदतनीस म्हणून काम स्विंकारते. सुरवातीला तुसडेपणाने वागणाऱ्या देवस्थळी बाई वयामध्ये जमीन आसमानचं अंतर असणारी मैथिली या जीवाभावाच्या मैत्रीणी होतात. भावनिक गुंतागुंत होत असतानाच देवस्थळी बाई मैथिलीला चुकलेल्या आयुष्यातील वळणांचे सुतोवाच करतात. दांडेकरांनी शंतनुला बरे करण्यासाठी वसुधा देवस्थळीशी शारिरीक मोल घेऊन मदत देतात. प्रो. देवस्थळीपासुन राहिलेल्या गर्भाला दांडेकर स्वत:च नाव लावतात. प्रो. देवस्थळी, मुलगा शंतनु बाई यांच्या मनाचे खिळखिळे झालेले कोपरे दिसून येतात. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याचे चढउताराचे अनुभव मैथिलीला ज्ञात होतात. यातून मैथिलीचे परिवर्तन पण फारसे कुठेही कोणाला गुंतून न घेता चाललेला प्रवास त्या प्रवासात काही क्षणाचे सोबती होतात. अशा मैथिलीच्या आयुष्यात मैत्रीण म्हणून रोहिणी, कावेरी, सुभद्रा, वासुकी, लली येवून जातात. समुद्रकिनाऱ्यावर अंधाऱ्या सावल्यांचे वाट पाहत बसलेली मैथिली तिच्या आईचे मॅथ्युज टिचरशी असलेले संबंध त्यातून तिच्या बालमनावर झालेला परिणाम, तिच्या घरी परतण्याची वेळ साडेसातची टिंगल अशा विविध छटा पहावयास मिळतात.

देवस्थळी बाईंच्या मृत्युनंतर दांडेकरांनी शंतनुच्या स्थळाबद्दल मैथिलीला विचारले त्याचाच विचार करताना ती अंतर्मुख होते. शंतनुचा इतिहास माहिती असून सुद्धा त्याच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेते. तिला मनापासुन वाटत असते कि हे लग्न नसून तडजोड आहे. लग्नाच्या अटी ही ती त्याला अतिशय साधेपणाने सांगते. आपल्या समाजात, आपल्या कुटूंबात स्त्रीचे वावरणे आणि स्त्रीत्वाची अनेक समर्थ पैलू तिचा आत्मविश्वास स्वाभिमान आणि त्यामुळेच कधीकधी वाट्याला येणारी अपमानस्पद वेदना याचे चित्रण 'आशा बगे' करताना दिसून येतात. शेलेच्या कवितांचा विषय घेऊन मैथिली पीएच.डी डॉ.अरूणाचलमच्या मार्गदर्शनाखाली मद्रास युनर्व्हसिटीची फेलोशिप घेऊन यातच तिचे दोन तीन वर्षे गेलेली असतात. त्यामुळे ती उशीराने

घरी निघणारी, लवकर निघण्याचा प्रयत्न करते. आयुष्यातल्या सांसारिक गोष्टीकडे लक्ष देण्याचा प्रयत्न करताना शंतनूच्या संथपणाला ती घाबरते. मरणाच्या पलीकडचा संथपणा ती अनुभवते. तिला माणसांचे राग, लोभ, अहंकार, मोह, हट्ट, प्रेम, रूसवा, वासना या गोष्टी माहितीतल्या असूनही शंतनू मध्ये या गोष्टींचा अभावच दिसून येतो. समाजाच्या नजरेतून असणारं पती-पत्नीचं नातं मैथिली शंतनूमध्ये दिसतं दोघेही आपली मर्यादा सोडून दुसऱ्याच्या अंत:करणात प्रवेश करताना दिसत नाहीत. आपल्या पद्धतीनं जीवन जगण्याचा अट्टाहास घेऊन वावरतात. सबमिशनच्या निमित्ताने डॉ.अरूणाचलम यांनी शंतनु मैथिलीला बोलावून जेवणाचा बेत केलेला असतो. अलिप्त असलेल्या शंतनूला सांभाळणारी मैथिली त्याच्या सोबत राहून त्याला एकटेपण जाणवू देत नाही. घरमालकीण असलेल्या धर्मराजन घरेलू स्वभावाच्या नविन नविन पदार्थ करणे खाऊ घालणे या बाबी मैथिलीच्या स्वभावात बसत नव्हत्या ऑफीसमधून वेळ करून आलेल्या शंतनूला ती आपला खोड्या करून, कपडे मळवून घरी परतलेला तिचा मुलगाच वाटतो. शंतनूच्या सहवासात समुद्र किनाऱ्यावर फिरत असताना केरकचऱ्याने व्यापलेला किनारा न दिसता स्वच्छ पाणीच व निसर्गाचे सौंदर्य पाहण्याची वृत्ती दिसून येते.

मैथिलीला घरात रांगणार बाळ हवं असत स्त्रीसुलभ स्वाभावान शंतनुकडे मागणी पण लग्न हिशोबातच धरायला तयार नसलेला शंतनू शंतनूला तिच जीवनातल यशस्वीपण दिसत असत पण त्यामागची तिची कष्टाळू वृत्ती, आयुष्यातले आई-वडीलाच्या मृत्यूचे आघात, शेजाऱ्याची हेटळणी, आत्याची आश्रीत, धर्माच्या नावाखाली लादले जात असताना तीची होणारी घालमेल, मिलिंदची नकारात्मक भूमिका व वास्तवापासून पळ, वय, बुद्धी, विचारपातळीमध्ये तफावत असणारा शंतनू अश्याच माणसामध्ये जगते नवे बंध शोधते. शंतनूच्या पराभूत मनामध्ये डोकावण्याचा प्रयत्न तीला लागलेली ओढ, ही देहाची नसून एक वेगळी अन्नुभूत ओढ शरीरापलीकडची आपल्या शरिरातून आपल्यासारखं घडविण्याची मातृत्वाची आस दिसून येते.

'आशा बगे' यांनी 'भूमी' तील 'मैथिली' ला घडवताना स्त्रीचे असे वेगळे व्यक्तीत्व सुरक्षित ठेवूनही फार स्त्रीचे असे वेगळे व्यक्तीत्व सुरक्षित ठेवूनही फार धाडसाने स्त्री-पुरूष

बंधाकडे पाहीलेले दिसते स्त्रीलाच सार्थपणे येऊ शकतील असे अनुभव त्यांनी मोठ्या आवेगाने व्यक्त केले आहेत. त्याच्या शैलीत व भाषेत अचूकपणे पकडण्याची शक्ती आहे. सामाजिक रितीरिवाज, रूढी, परंपरा, परिस्थिती यामधुन निर्माण झालेल्या दु:ख–कष्टाचं चित्रण 'आशा बगे' तरलपणे करतात. व्यक्तीमनाच्या वेगवेगळ्या सुक्ष्म छटा त्याच्या लेखणात प्रत्ययकारी रूप घेतात. स्त्रीच्या भावजीवनाला तिला व्यथीत करणाऱ्या हळूवार दु:खाला त्याच्या लेखणात महत्वाचे स्थान आहे.

मैथिली लहान मुलाच्या गोष्टीतून आपल बालपण न्याहाळत असते पहिल्या मुलीचा मृत्यू तो तिला चटका लावून जातो. आई (गर्भ) मुलाच वजन पेलू शकली नाही हे दु:ख सातत्याने बोचत असते. "दु:ख फारस न करता सुरवात व शेवट आपणच करायची."[१] असे शंतनूला समजावते. अंशूमनचा जन्म हा शंतनूचा पूर्णजन्म तिला वाटत असतो. ऑफीसमध्ये बाजूला पडलेला, शंतनू अंशूमनमध्ये पूर्णपणे गुंतला होता.

शंतनूविषयी आत्या जवळ बोलते, "वरवर दिसायला ठीकच आहे ग ! पण काही तरी ठिक नाहीही. तशी खुपशी अपेक्षाही नव्हतीच ग. पण साध्याश्या गोष्टीत अडतो आम्ही एकमेकाजवळ पोचताच येत नाही."[२] यातून बगेनी स्त्रिया व्यथा,तिची स्वप्ने, आकांक्षा व्यक्त केलेल्या दिसून येतात त्याची ही कादंबरी वाचताना सर्व प्रथम जाणवते ते हे की आशा बगे अत्यंत कमी अवकाशात अधिकाअधिक संमिश्र आशय व्यक्त करतात. स्त्रियांचे विश्वही स्वयंपूर्ण आहे हे जाणवते.

मैथिलीला जाणवते कि आपल्यामुळे शंतनुची घुसमट होतेय. त्यांच्या मित्राकडून त्याची कळलेली मनोगते यातून मैथिलीच ठरवते. बेंगलोर युनिव्हर्सिटीत जॉईन होते. यातून शंतनूला आनंद होतो पहिल्यापेक्षा सुखावतो परंतू मैथिली दु:खावून संन्यासिनीसारखी राहते. सुधिरशी निखळ मैत्री परंतू घरापासून पतीपूत्र यांच्यापासुन दूर आलेल्या मैथिलीला कोणी समजावून घेत नाही. भाड्याचे घर सोडण्याची वेळ येते पण ती आपली मैत्री पावित्र्याने जपते. शंतनूचे आजारपण मुलाच्या करीयरच्या आड येवू नये म्हणून घरी परतणारी मैथिली 'भूमी' त दिसते. येणाऱ्या अनेक अडचणीतून जीवनाला सामोर जाणारी 'मैथिली' 'आशा बगे' नी कलात्मकतेने चित्रित

केलेली दिसते.

**आधुनिक स्त्रियांच्या सामाजिक समस्या :-**

"घोडी म्हणजे घोडा नव्हे, कोंबडी म्हणजे पक्षी नव्हे, स्त्री म्हणजे व्यक्ती नव्हे "

– एक रशियन म्हण

"विसाव्या शतकाची पहाट ही अनेक पद्दलितांच्या घटकांच्या आयुषयातील एक वेगळीच पहाट आहे. नवी सांस्कृतिक जडण-घडण, दडपलेले हुंदके व श्वास मुक्त होण्याची चिन्हे दिसत असताना समाजातळ ढवळून टाकावा व नवीन मुल्यांनी आकार घ्यावयासाठी नवीन समाज निर्मितीची स्वप्ने पडू लागली."[३] कित्येक वर्षापासुन स्त्रीची दु:खे कमी करण्याचे प्रयत्न सामाजिक सुधारकांनी केले. त्यांच्या प्रयत्नाने विविध कायदे अस्तित्वात आले. पुरूषी वर्चस्व असलेला समाज, स्त्री-पुरूषाचे संबंध बरोबरीचे नसून ते श्रेष्ठ व कनिष्ठतचे हा भेद नैसर्गिक अर्थाने योग्य असून त्याचे साद पडसाद तिच्या क्षमता व पात्रतेवर आघात करताना दिसतात. स्त्री-मूल, पुरुष-मुलं यांच्यामध्ये घरातच सामाजिकरण करताना जमीन-अस्मानचं अंतर निर्माण होते. परंपरागत स्त्रीची प्रतिमा मुलीवर तिच्या संवेदनाक्षम मनावर ठसविली जाते व तिचे कार्यक्षेत्र मर्यादित केले जाते. स्त्रियांना नोकरी व व्यवसायात दिली जाणारी समानता फसवी आहे. कारण हे प्रमाण पुरूषांच्या मानाने कमी आहे. लोकसंख्येच्या वयोगटानुरूप अभ्यास स्त्रियांची उपेक्षितता लक्षात आणून देतो. प्रजोत्पादनाचे यंत्र, ओझ्याचा बैल, भोगण्याची सजीव वस्तू म्हणून वावरणारी स्त्री गुदमरलेली दिसते मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष, दारिद्रय मुलीकडे पाहण्याचा पारंपारिक दृष्टीकोन अज्ञानामुळे मुलींच्या शिक्षणाबद्दल पालकांची उदासिनता इ. कारणामुळे स्त्रियांची शिक्षणक्षेत्रात पिछेहाट दिसते.

कुटूंबातून मुलींना गौण स्थान देऊन तिला परक्याचे धन व चूल मूल हेच कार्यक्षेत्र मानूण घरकामासारखी पारंपारिक कामे दिली जातात. एकत्र कुंटूब पद्धतीमध्ये सर्वाच्या आवडीनिवडीचा विचार करावा लागतो. पती व मुलाचा स्त्रियांना खास विचार करता येत नसल्याने घरात व्यक्तींची संख्या जास्त असल्याने स्वतंत्रपणे निर्णय घेता येत नाही. शिक्षण घेताना मुलींना घराबाहेरच्या जगात व समाजात मिसळण्याची संधी मिळते वेगवेगळे स्वभाव व

व्यक्तिमत्वे, विचार असणाऱ्या समवयस्क यांच्याशी विचारांची देवाण-घेवाण होते. नि:संकोचपणे व स्वच्छ मनोवृत्तीने वागण्याचा अनुभव येतो. स्त्री-पुरूषामध्ये असणाऱ्या नैसर्गिक आकर्षणाला विकृत स्वरूप येण्याची शक्यता असते. सामाजिक परिवर्तनास कारणीभूत ठरणाऱ्या अनेकविध सामा. आर्थिक, शैक्षणिक व राजकीय बदलांमूळे समाज तळापासून उफाळून निघत आहे. औद्योगीकरण लादलेले अपरिहार्य व एकांगी बदल वगळता स्त्री जीवनात महत्वाचे परिवर्तन झालेले नाही. समता व स्वतंत्रता ह्या उदिष्टाचा अन्वयार्थ स्पष्ट झालेला दिसत नाही. समाजाने त्याच्यावर लादलेले तिहेरी ओझे प्रजनन मुलाचे संगोपन, घराचा सांभाळ अर्थाजन यामूळे स्त्रिया परावलंबी बनतात असे वाटते.

आर्थिक स्वातंत्र्याचे महत्व स्त्रीयांना कळल्याने सधन घरातील स्त्रियांनी वारसा हक्काची मागणी केली तर नवशिक्षित पांढरपेशा तरूणी नोकरीकडे वळल्या त्याची ही वृत्ती समाजाला मानवली नाही. पुरूषांना स्त्रीच्या कर्तृत्वाबद्दल आदर आणि विश्वास नसतो. स्त्री निवड अव्यवहार्य आहे अनेक विघ्न पार पाडुन नेमणुक झाली तर कामात तिच्याबाबत पक्षपात होतो. स्त्रिचे स्वत्व मीपण हे स्त्रीजातीत शोधण्याची प्रवृत्ती सोडुन मानव म्हणुन स्वत्वाचा शोध व्यक्ती म्हणून घेताना स्त्री कमी पडते.

१९७५ मध्ये स्त्री दशक जाहीर झाल्यावर तिचे विचार, भावना याची जाणीव होत गेली या सर्वाचा महाराष्ट्रामध्ये खोलवर परिणाम झाला. पहिल्या महायुद्धानंतर मतदानाचा हक्क आणि काही देशांना स्वातंत्र्य मिळाले. औद्योगिक क्रांतीने स्त्रियांना घराबाहेर काढून कारखाने गिरण्या यातून कामाला लावले. स्त्रीला मूल संसार यातून बाहेर पडून तिच्या आवडीच्या क्षेत्रात जाण्यास वाव मिळाला स्त्रीला माणूस म्हणून जगण्याची आकांक्षा निर्माण झाली. समाजातील स्त्री जसजसी शिक्षित, विचारशील बनत गेली त्यामूळे स्त्री नवऱ्याची गुलाम होऊन न राहता एक परिपूर्ण स्वतंत्र व्यक्तिमत्व सिद्ध करू लागली. १९५५ च्या कायद्याने हिंदु पुरूषाला प्रथम पत्नी जिवंत असताना दुसरे लग्न करता येणार नाही ते केले तर तुरूंगवासाची शिक्षा आहे. नव्या कायद्याने स्त्रीचे पालकत्वाचे अधिकार वाढवून तिला जवळजवळ पुरूषाच्या बरोबरीने अज्ञान मुलाच्या बाबतीत पालकत्वाचे हक्क लाभले आहे. भारताच्या राज्यघटनेने स्त्रीला स्वतंत्र नागरिकत्व देऊ

न समान दर्जा व समान हक्क दिला आहे. स्त्रीवर्ग मात्र शतकानुशतकाच्या गुलामी वागणुकीमुळे थंड निचेष्ट झाल्यासाखा पडला होता. त्यांच्यात हात हालवण्याची किंवा स्त्रिया सुशिक्षित झाल्यातरी आपल्या पलीकडे जग आहे हे पाहण्याचे सामर्थ्य नव्हते याची त्यांना जाणीवच नव्हती इतक्या त्या आत्मकेंद्रीत आहेत. शिक्षणाने त्यांच्या विचार कक्षा वाढाव्या तेवढ्या वाढलेल्या दिसत नाहीत. स्वपलिकडचे जगच त्यांना माहीत नव्हते. स्वातंत्र्य लढ्यामध्ये पुरूषांच्या खांद्यालाखांदा लाऊन तुरूंगवास भोगणाऱ्या स्त्रीला कोणीही कमी लेखले नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कायद्याने स्त्रीला समानतेचा हक्क दिला. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वैवाहिक, धार्मिक याबाबतीत तिला मानाचे स्थान मिळाले. संगीत, कला,साहित्य या क्षेत्रात मोलाची कामगिरी केली. वैयक्तिक गुणवत्तेच्या कक्षात बुध्दिमत्तेच्या उच्चपातळीमुळे उच्चअधिकाराच्या जागा मिळविल्या. सर्व क्षेत्रात यशस्वी स्वकष्टावर पदार्पण करून ही वैयक्तिक पातळीवर स्त्रीच्या जीवनाची पातळी उंचावलेली दिसत नाही. यात प्रामुख्याने सामाजिक उणीवा,अन्याय नाहिसा करण्याच्या तळमळीचा प्रादुर्भाव दिसून येतो. आजही मुलींची लग्ने १८ वर्षाच्या आधीच कायद्याने मनाई केली असताना होताना दिसतात. बौध्दिकदृष्टया स्त्री - पुरूषापेक्षा कमी नाही परंतु तिला बौध्दिक विकास करण्यासाठी संधी न देणाऱ्यांचीच संख्या दिसून येते. परंतु कित्येक स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिध्द करून दाखविले आहे अशी कित्येक उदाहरणे देता येतील. ज्ञानासाठी कष्ट करणारी आनंदीबाई जोशी, आपले राज्य टिकविण्यासाठी आत्माहुती देणारी राणी लक्ष्मीबाई, पतीला साथ देवून समाजाचा छळ सोसणारी सावित्रीबाई की जिच्यामुळे स्त्रियांना शिक्षणाचा मार्ग खुला झाला असे असूनही स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. कारण पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये चुल आणि मुल हेच तिच्या वाट्याला आलेले आहे. आज कायद्याने समानता दिली आहे. परंतु पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये जोमाने वाढविलेले पुरूषी अहंकार जास्त प्रमाणात दिसतो तिला केवळ समाजात समानता मिळून उपयोग नाही. तिला घराघरात, मनामनात समानता मिळणे आवश्यक आहे. स्त्री शिक्षणात ज्ञानाच्या शाखेमध्ये प्रवेश करण्याची संधी मिळाल्याने पुरूषांच्या राखीव म्हटल्या जाणाऱ्या क्षेत्रात स्त्रियांनी प्रवेश मिळविलेला दिसतो. त्यातिथे चांगल्या गुणवत्तेने मेडीकल क्षेत्रात पदार्पण केलेले दिसते. पण आयुष्यात तरूण स्त्रिंना

इतक्या वैशिष्टय पुर्ण ज्ञानशाखेत उच्चनैपुन्न मिळावल्यावरही वैवाहिक आयुष्यात या तरूण स्त्रींना त्याचा काही उपयोग न करता स्वस्थ बसलेले पाहिले की त्यांच्या शिक्षणावर सरकारचा झालेला खर्च म्हणजे जनतेचा राष्ट्राचा निष्कारण वाया गेलेला खर्च ही वेळ येते. काही स्त्रिया खेडेगावामध्ये ग्रामसेविका, परिचारीका, शिक्षिका नोकरी करताना आढळतात. परंतु राजकीय पाठबळ असलेले प्रतिष्ठापावलेले श्रीमंत गुंड त्या ठिकाणी त्रास देतात. अशा कारणांनी शिक्षण असूनही स्त्री काही करू शकत नाही. शिक्षणाने कायद्याचे हक्क अधिकाराचे ज्ञान मिळते. आत्मविश्वास मिळतो परंतु हे सर्व समजत असूनही सुशिक्षीत स्त्री सामाजिक पाशवी शक्तीची बळी ठरते. त्यांच्या अमानुषतेचे आक्रोश भिंतीत मिटून जातात. स्त्री जागृतीच्या पार्श्व भूमीवर सुशिक्षित आणि अशिक्षित या दोन स्वरूपातील स्त्री एकाच ठिकाणी वावरताना दिसते. व्रतवैकल्य, हळद कुंकू, अशा अंधश्रध्दा पारंपारिकतेने चालत आलेल्या रूढी यांनी स्वत:चे जीवन झाकोळून टाकलेले दिसते. दुसऱ्यांना बरं वाटाव म्हणून संकोचीत जीवन जगतात. स्वत:वर घराणेशाही चालवण्यासाठी मर्यादा लादून घेतात. समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये कायद्याने स्त्री-समानता केली असली तरी हुंडाबंदी, शारिरीक मानसीक, छळाविषयी बंदी, गर्भ चिकित्सा विषयक बंदी यांच्या यामध्ये स्त्रियाच सामील असतात. स्वत:च स्त्री असणारी मुलगी नको म्हणते.

स्त्री-शिक्षणाची स्त्रीयांच्या सुधारणांची सुरूवात महाराष्ट्रात जोतिबा फुलेंपासून होते. समाजाचा विरोध पत्करूनही फुले पती-पत्नींनी स्त्रियांसाठी आवश्यक असलेली ज्ञानगंगा समाजाच्या दाराशी आणली. शिक्षण हा प्रत्येक मानवाचा मुलभूत हक्क आहे. भारतीय राज्यघटनेनुसार स्त्रीला ज्ञानाची सर्व क्षेत्रे खुली झाल्याने डॉक्टर, इंजीनिअर, संगणकतज्ञ, प्राध्यापक, शास्त्रज्ञ इ. समाजातील सन्माननीय स्थानावर असलेल्या दिसतात. तसेच समाजातील मध्यम स्थान असलेल्या ठिकाणी स्त्रियांची संख्या जास्त दिसून येतात. उदा. कारकून, स्टेनो, टेलीफोन ऑपरेटर्स, स्वागतिका, नर्सेस,शिक्षिका. आज शिक्षण संस्था शिकणाऱ्या मुलींची संख्या जास्त दिसते. परंतु ग्रामीण आणि आदिवासी भागातील स्त्रिया मोठ्या संख्येने शिक्षणापासून काही ठिकाणी वंचीत आहेत. स्वत:च्या सुप्त सामर्थ्याची ओळख पटल्याने मानवाचा कामातून विकास होतो. मग स्त्रिया शिक्षण घेऊन अशा तऱ्हेचे काम करतात का ?

पदवी, नोकरी, विवाह, संसार या चाकोरीत फिरणाऱ्या स्त्रिया अर्थार्जनाचे साधन ठरलेल्या समाजातील बुध्दिमत्तेच्या जागा पुरूष सहजपणे पटकावतात. कारण स्पर्धात्मक पातळीवर उतरण्याची भिती, संघर्षात्मक वातावरण, आव्हान म्हणून स्विकारता येत नाही. नवे जुने यातला फरक न कळल्याने मनाची डोलायमान परिस्थिती निर्माण होते. समाज परिवर्तनासाठी मानसीकदृष्ट्या स्वावलंबी व स्वनिर्णयी असणे हा अनिवार्य घटक आहे. शिक्षित स्त्रिला स्त्रियांच्या व्यथा जाणून घेताना तिच्या जाणीवेचे रूपांतर, वर्तन बदलामध्ये परावर्तित झाले पाहिजे. काही स्त्रियांनी दुय्यम दर्जाची वागणुक दिली जाते त्याबद्दल दक्ष असणे गरजेचे आहे. लिंगभेदापलीकडे जावून एक व्यक्ती म्हणून प्रत्येकाने सबल होण्याचा हक्क आहे हे समजून सबलपणा हे शारिरीक बल नसून मानसिक सामर्थ्य आहे. सामाजिक परिस्थिती पाहताना उच्चशिक्षित स्त्रिया, शिक्षणतज्ञ, राजकारणी आणि धोरणात्मक निर्णय घेणारे विचारवंत हे स्त्रियांकडे दुषित दृष्टीने पाहतात. उच्चपदस्थ, दिग्गज असणाऱ्या विव्दान पत्नी किंवा सहकारी स्त्रियांचा मान ठेवताना दिसत नाही. शिक्षण क्षेत्रात सहकारी स्त्रियांचा विनयभंग वृत्तपत्रातून गाजत असलेला दिसतो. शैक्षणिक स्तरावर स्त्रिचा सन्मान होणाऱ्या शिक्षणाची नैतिक गरज दिसून येते. शिक्षक, पालक, समाज यांच्या मनोवृत्तीत बदल मोठ्या प्रमाणात करावयास हवा. समाजातील दबावाला बळी पडलेल्या स्त्रियांमध्ये सुशिक्षित स्त्रियांचे प्रमाण जास्त असून हुंड्यासाठी, पैशासाठी बळी जाणाऱ्या स्त्रियांमध्ये डॉक्टर्स, शिक्षिका, ऑफिसर्स इत्यादींची संख्या दिसते. त्यांची मानसीक व शारिरीक शोषण होते. आत्महत्येला प्रवृत्त करून जगण्यावरचा त्यांचा अधिकार काढून घेतला जातो. आजही दारूड्या नवऱ्यासाठी स्त्रिया वडाच्या झाडाचे पुजन करताना दिसतात. सौभाग्यवती स्त्रिया विधवेला अशुभ मानतात. अशा मानसिकतेचा गंभीरपणे विचार करून स्त्रीयांना मिंथकाच्या जगातून बाहेर आणून वास्तव्याचे भान द्यायला हवे. त्याच बरोबर औपचारिक व अनौपचारिक शिक्षण त्यांच्या जगण्याचा भाग व्हायला हवा ग्रामीण भागात गरिब कुटूंबातल्या मुलींच्या शिक्षणाचा विचार केला जात नाही. घरकाम करणे शाळेत न जाणे त्यामुळे अभ्यासात मागे पडून वारंवार नापास त्यामुळे शाळा सोडण्याच्या प्रमाणात वाढ होते. शिक्षणाविषयाच्या सामाजिक पुर्वग्रहामुळे मुलींकडे सोपवल्या जाणाऱ्या भुमिकामुळे मुलींचे शोषण होते. लग्न लवकर

करण्याच्या प्रवृत्तीमुळे शिक्षणापासून वंचीत राहीलेल्या मुलींच्या आयुष्यात बकालपणा, अस्वच्छता, जीवनाविषयी असुरक्षितता, टोकाचे दारिद्रय, महाभयंकर रोग, यांची सुरूवात होते. महाराष्ट्राला स्त्री-शिक्षणाची मोठी परंपरा असून येथे शैक्षणीक क्रांती दिसत नाही. गर्भलिंग चिकित्सा करून मुलीचा गर्भ जन्माआधीच नष्ट करण्याचे प्रमाण पंजाब, हरियाणा, हिमाचलप्रदेय, छत्तीसगड मध्ये दिसते असे वाटते. स्त्रीचा दर्जा किती कमी लेखून घसरवलेला आहे हे दिसते. एकतर्फी प्रेमामुळे बळी गेलेल्या मुली उच्च शिक्षित होत्या. घरातील अत्याचार, पैशासाठी केले जाणारे बलात्कार, चित्रपटामध्ये काम देतो म्हणून फसवल्या जाणाऱ्या, पैशासाठी वाईट अवस्थेतील छायाचित्रणे, पुरूषीवृत्तीने त्यांच्याकडे उपभोग घेण्याची वस्तु म्हणून पाहणे, समाजातील शिक्षणतज्ञ विचारवंतांना विचार करायला लावणाऱ्या बाबी दिसतात. शिक्षणाने सबला न बनता दबाव, शोषण यांना विरोध करण्याचे बळ धैर्य निर्माण झाले नाही. स्त्री सौंदर्य हा प्रदर्शनाचा भाग ठरल्याने पैसा प्रसिध्दी मानसन्मान स्वत:च्या देहाचे प्रदर्शन केल्याने स्त्रियांना पैसे मिळतात. हा प्रकार बंद होवून फ्रेंडशिपचे फिल्मी प्रकार सातत्याने घडताना दिसतात. स्त्रीची आदर्श प्रतिमा देवी, पतीव्रता, माता, कुमारिका असे तिच्या स्थितीचे उत्थापन तर दुसऱ्याबाजुला राक्षसी वेश्या, कुलटा, विधवा, घटस्फोटीता, प्रौढकुमारिका अशी अध:पतित प्रतीमा आहेत. 'स्त्री' चा पुरूषाशी असलेल्या संबंधावरून या भूमीका आपोआप तिला बहाल केल्या जातात.

## निष्कर्ष:-

"भूमी" तील नायिका मैथिली ही आधुनिक विचारांची सुसंस्कारित आहे. धर्माच्या नावाखाली लादताना झालेली मनाची घुसमट फारशी कोणाला न दाखवता ज्यांनी आपल्या आयुष्याला अर्थ दिला त्या पुस्तकांचा आधार महत्वाचा वाटतो. कारण कुणाच्याही सहानुभूतिची अपेक्षा करणे किंवा दु:ख कवटाळत बसणे तिच्या मनाला पटत नव्हते. जुना भूतकाळ विसरून पुन्हा स्वत: अभ्यासामध्ये झोकून घेते. मनाचे धागे जुळत नसताना व शंतनूचा पूर्वइतिहास माहित असून ही त्याच्याशी लग्न अगदी साध्या पद्धतीने करते. मद्रास विद्यापीठाची फेलोशिप घेऊन पीएच.डी. करते. आपले मार्गदर्शक डॉ. अरूणचलम, मित्रासर यांच्या बद्दल अपार

सहानुभूती तिच्या वर्तनातून पहायला मिळते. पती, मुलगा यांच्या सुखाआड न येता स्वत: संन्यासिनीसारखे आयुष्य जगते. शंतनू अंशूमनच्या करिअर मध्ये आडवा येऊ नये म्हणून ती त्याला झेप घेण्यास सांगते व स्वत: शंतनूसाठी पुन्हा घरी परतते. सुधीर व सुभद्राशी निखळ मैत्री जपते. पण घरापासून विशेषत: मुलगा व पती सोडून राहणाऱ्या मैथिलीच्या आयूष्यावर संशयाचे जाळे विणले जाऊन राहत असलेले भाड्याचे घर सोडण्याची वेळ येते. पण सुधीरचे आई–वडिल मैथिलीच्या सद्वर्तनाच्या प्रेमात पडतात त्यासंबधी ते म्हणतात, वेळेची चुकामूक झाली नाहीतर तुझ्यासाठी मुलगी घरी आली असती.

स्त्रिला 'स्व' त्वाचे जाणीव झाल्यानंतर ती आत्मविश्वसाने आत्मभान जागृत करू शकते परंतू समाजव्यवस्थेमध्ये तिला अनेक संकटांना तोंड द्यावे हे दिसून येते. पुरूषी वर्चस्व असलेल्या समाजामध्ये स्त्रिचे स्थान नगण्य दिसते. विभक्त कुटूंबपद्धती, पर्यावरण, नोकरीच्या ठिकाणी दुय्यम स्थान, स्त्रीभ्रुनहत्या, प्रसारमाध्यमाचा दुरूपयोग, असमान भूमिका स्त्रीच्या क्षमतेविषयी शंका स्त्री ही उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन यामुळे मिळवत्या स्त्रिची दशा, अडाणीपण या आधुनिक स्त्रीच्या समस्या दिसून येतात.

# संदर्भ – ग्रंथ – सूची


१) आशा बगे — भूमी.
मौजप्रकाशन गृह, दुसरी आवृत्ती,
१५ जून २००६ पृष्ट – १२६.

२) तत्रैव, पृष्ट.१३०.

३) गुरूनाथ नाडगोंडे — सामाजिक आंदोलने.
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
विजयानगर, पूणे–३०.
प्रथमावृत्ती – १९८६ पृष्ट–७९.